**<u>“नगरपरिषद क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विकास कार्यक्रमासाठी सहायक अनुदान” (लेखाशिर्ष २२१७ ०९५१) योजनेंतर्गत निधी मंजूर करण्याबाबत.</u>**

<u>गडहिंग्लज नगरपरिषद करीता मंजूर रक्कम रु.४.९९ कोटीच्या अनुषंगाने १००% शासन हिस्स्याप्रमाणे उर्वरीत रक्कम रु.२.४९ कोटी मंजूर करण्याबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**

**नगर विकास विभाग**

**शासन निर्णय क्रमांक:- नपया-२०२३/प्र.क्र.१११(भाग-१)/नवि-१६ (ई- १५२८९०८)**

**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**

**दिनांक:- १६ एप्रिल, २०२६**

**<u>संदर्भ :-</u>**

(१) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.:-संकिर्ण-१०९७/६८४/नवि-१८, दि.२६ फेब्रुवारी, १९९७

(२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.:-संकिर्ण-१०९७/२०५५/नवि-१८, दि.२५ ऑगस्ट, १९९७

(३) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.:-तिक्षेवि-२०२२/प्र.क्र.८९/२००२/नवि-१८, दि. २४ ऑगस्ट, २००४

(४) नगर विकास विभाग , शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.७६(भाग-३)/नवि-१६ (ई- १०३४४१५), दि. २५ मार्च, २०२५

(५) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. नपया-२०२३/प्र.क्र.१११(भाग-१)/नवि-१६ (ई- ६६०९२९), दि. २१ मार्च, २०२५

**<u>प्रस्तावना :-</u>**

राज्यातील अनेक तीर्थक्षेत्रांच्या/ यात्रास्थळांच्या ठिकाणी भेट देणाऱ्या यात्रेकरुंची संख्या फार मोठ्या प्रमाणात असते. बऱ्याच तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी वर्षामधील काही ठराविक कालावधीमध्ये मोठ्या संख्येने यात्रेकरु भेट देतात. अशी तीर्थक्षेत्रे/ यात्रास्थळे ज्या स्थानिक नागरी संस्थांच्या क्षेत्रात आहेत, त्यांना अशा मोठ्या संख्येने येणाऱ्या यात्राकरुंना पुरेशा प्रमाणात नागरी मूलभूत सोई-सुविधा पुरविण्याच्या दृष्टीने सहायक अनुदान देण्यात येते. संदर्भाधीन क्र.(१), (२) व (३) येथील शासन निर्णयान्वये सदर योजनेचे निकष निश्चित करण्यात आलेले आहेत. तसेच सदर्भाधीन क्र.(४) येथील शासन निर्णयान्वये विविध योजनांचा सन २०२१-२२ व सन २०२३-२४ या आर्थिक वर्षातील निधी नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मुंबई यांच्या स्तरावर आहरीत करण्यात आलेल्या निधीतून जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांना निधी मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :-</u>**

गडहिंग्लज नगरपरिषद जि. कोल्हापूर करीता संदर्भाधीन क्र.५ येथील शासन निर्णयातील विवरणपत्रामधील अ.क्र.१ अन्वये गडहिंग्लज नगरपरिषद क्षेत्रातील तीर्थक्षेत्र श्री.देवी महालक्ष्मी देवस्थान, गडहिंग्लज करीता रु.४.९९ कोटी मंजूर निधीपैकी शासन हिस्सा रु.२.४८ कोटी निधी वितरीत

करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील नगपरिषदेचा २५ % हिस्सा व श्री.देवी महालक्ष्मी देवस्थान ट्रस्ट यांचा २५ % हिस्सा माफ करुन १००% राज्य शासन हिस्स्यास मंजूरी देऊन त्याकरीता रक्कम **रु.२.४९ कोटी (अक्षरी रक्कम रु.दोन कोटी एकोणपन्नास लक्ष मात्र)** इतका निधी पूर्वोदाहरण होणार नाही या तत्वावर विशेष बाब म्हणुन खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

२. या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करावयाच्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ करिता वितरीत कलेल्या निधीपैकी १००% खर्चाचे विनियोग झाले असल्याची खातरजमा आहरण व संवितरण अधिकारी यांनी करावी व असे उपयोगिता प्रमाणपत्र देयकासोबत जिल्हा कोषागारात सादर करावे.

३. तीर्थक्षेत्र श्री.देवी महालक्ष्मी देवस्थान, गडहिंग्लज करीता यापूर्वी वितरीत केलेल्या रु.२.४८ कोटी निधी खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केल्यानंतर या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेला रु.२.४९ कोटी निधी स्वतंत्र शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येईल.

४. सदर निधी कामावर खर्च करण्यामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची संबंधित जिल्हाधिकारी यांनी दक्षता घ्यावी.

५. या संबंधीचा खर्च मागणी क्र.एफ-२, मुख्य लेखाशिर्ष २२१७, नगरविकास ८०, सर्वसाधारण १९१, नगरपरिषदांना सहाय्य, (००) (१४) नगरपरिषद क्षेत्रातील यात्रास्थळांच्या विकास कार्यक्रमासाठी सहायक अनुदान, ३१, सहायक अनुदाने (वेतनेतर), (२२१७ ०९५१), या लेखाशिर्षाखाली सन २०२३-२४ मधील मंजूर तरतूदीनतून भागविण्यात यावा.

६. संदर्भाधीन क्र. (१) ते (५) येथील शासन निर्णयामधील अन्य सर्व अटी व शर्ती लागू राहतील.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०२६०४१६१५५८३५८८२५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by SACHIN DATTATRAY SAHASRABUDDHE
Date: 2026.04.16 15:59:29 +05'30'

**(सचिन द. सहस्त्रबुध्दे)**
**उप सचिव,महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा युवक कल्याण व अल्पसंख्याक विकास) महोदयांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. मा. राज्यमंत्री (नगर विकास) महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

५. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, बेलापूर भवन ७ वा मजला, नवी मुंबई - ४०० ६१४.

६. विभागीय आयुक्त, पुणे

७. जिल्हाधिकारी, कोल्हापूर.

८. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई.

९. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर.

१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

११. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.

१२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई

१३. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, कोल्हापूर

१४. जिल्हा सह आयुक्त, नगरपालिका प्रशासन जिल्हाधिकारी कार्यालय, कोल्हापूर

१५. जिल्हा प्रशासन अधिकारी, कोल्हापूर

१६. मुख्याधिकारी, गडहिंग्लज नगरपरिषद, जि. कोल्हापूर

१७. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.

१८. कार्यासन नवि-४, नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

१९. निवड नस्ती (नवि-१६), नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.